**राज्यातील ग्रामीण / नागरी भागातील पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ टँकरव्दारे करावयाच्या पाणी पुरवठयाबाबत मार्गदर्शक सूचना**

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,**
**शासन परिपत्रक क्र. टंचाई-१००५/प्र.क्र. ३०५/पापु-१४**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.**
**दिनांक २४ जानेवारी, २००६**

**संदर्भ :**

१. शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्र. टंचाई-३०९९/प्र.क्र. १३/पापु-१४, दिनांक १ फेब्रुवारी, १९९९.
२. शासन परिपत्रक, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्र. टंचाई-३००१/प्र.क्र. १३३/पापु-१४, दिनांक १० एप्रिल, २००१
३. शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्र. टंचाई-१००२/प्र.क्र. २९०/पापु-१४, दिनांक १९ सप्टेंबर, २००२
४. शासन परिपत्रक, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्र. टंचाई-१००२/प्र.क्र. ३९१/पापु-१४, दिनांक ४ जानेवारी, २००३ व दि. ५ फेब्रुवारी, २००५
५. शासन परिपत्रक, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्र. टंचाई-३००३/प्र.क्र. १४/पापु-१४, दिनांक २७ जानेवारी, २००३
६. शासन पत्र, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्र. टंचाई-३००३/प्र.क्र. ४९/पापु-१४, दिनांक २८ एप्रिल, २००३
७. शासन पत्र, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र. टंचाई-१००३/प्र.क्र. १८६/पापु-१४, दिनांक १९ मे, २००३

**परिपत्रक :**

संदर्भ क्र. १ येथील शासन निर्णयान्वये, राज्यातील पिण्याच्या पाण्याची टंचाई असलेल्या ग्रामीण भागात पाणी टंचाई निवारणार्थ टँकर/बैलगाडीने पाणी पुरवठा करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना देण्यात आलेले आहेत. टँकरने पाणी पुरवठा करणे हि एक खर्चिक बाब असल्याने, ही उपाययोजना अपरिहार्य परिस्थितीतच मंजूर व्हावी अशी अपेक्षा असते. तीव्र पाणी टंचाईच्या परिस्थितीत पाणी पुरवठा करण्यासाठी, शक्यतो शासकीय टँकर्सचा वापर करण्यात यावा, असे शासनाचे धोरण आहे. शासकीय टँकर्स उपलब्ध नसल्यास, खाजगी टँकर्स/ ट्रक्स भाडयाने उपलब्ध करुन घेण्याचे अधिकार जिल्हाधिका-यांना देण्यात आलेले आहेत. यासाठी निविदा मागविण्यात याव्यात व कमीतकमी दराच्या निविदा स्वीकाराव्यात, असे शासनाचे आदेश आहेत. संदर्भाधीन क्र. ४ व ५ च्या परिपत्रकान्वये तसेच क्र. ६ च्या पत्रान्वये टँकरच्या नियोजित खेपांवर देखरेख ठेवण्यासंदर्भात तसेच टँकरच्या निविदा मागविण्यासंदर्भात मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. परंतु शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, टँकरने पाणी पुरवठा करताना, टँकर निविदा प्रक्रिया, टँकरच्या खेपा याबाबत योग्य ते नियंत्रण क्षेत्रीय स्तरावरुन ठेवले जात नसल्याने, टँकरने पाणी पुरवठा करण्यासंदर्भात अनेक तक्रारी शासनास प्राप्त होत आहेत. पिण्याच्या पाण्याच्या तीव्र टंचाईच्या काळात टँकरने पाणी पुरवठा करणे, ही योजना अधिक कार्यक्षमरित्या राबविली जावी व तक्रारीस वाव राहू नये या दृष्टीकोनातून शासनाच्या मार्गदर्शक सूचनांची काटेकोर अंमलबजावणी होणे क्रमप्राप्त आहे. सबब टँकरने



623

पाणी पुरवठा करण्यासंदर्भात संदर्भाधीन क्र. २,४ व ५ येथील परिपत्रकान्वये व संदर्भाधीन क्र. ६ च्या पत्रान्वये दिलेल्या सुचना अधिक्रमीत करुन आता पुढीलप्रमाणे सुचना देण्यात येत आहेत.

**अ) टँकर निविदा प्रक्रिया :-**

१) ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ खाजगी टँकर /ट्रक्सव्दारे करावयाच्या पाणी पुरवठयासाठी, टंचाईच्या तीव्रतेनुसार किती खाजगी टँकर्सची आवश्यकता निर्माण होईल याबाबतचा अंदाज घेऊन, टँकरने पाणी पुरवठा करण्यासाठी ठेकेदाराकडून निविदा मागवाव्यात. त्यासाठी निविदासूचना राज्य व जिल्हा पातळीवरील अधिक खपाच्या वर्तमानपत्रांमध्ये प्रसिध्द करावी, जेणेकरुन त्यास व्यापक प्रसिध्दी मिळेल. प्राप्त निविदातून कमीत कमी दराची निविदा स्विकारावी. मात्र, हे दर शासनाने वेळोवेळी निश्चित केलेल्या दरांपेक्षा जास्त नसावेत. शासकीय दरापेक्षा जास्त दराच्या निविदा प्राप्त झाल्यास, सर्व निविदादारांना समक्ष बोलावून तडजोडीव्दारे दर ठरविण्यात यावेत.

२) अनेक जिल्हयांमध्ये निविदा अंतिम करताना, स्विकारलेल्या किमान दराच्या निविदा धारकांकडे किती टँकर पुरविण्याची क्षमता आहे, ही बाब तपासून पाहिली जात नाही. त्यामुळे मोठया प्रमाणात टँकर्सची आवश्यकता निर्माण झाल्यास निविदा धारक एकाच वेळी पुरेसे टँकर उपलब्ध करुन देऊन शकत नाही अथवा नादुरुस्त / जीर्ण टँकर पुरवितो. पर्यायाने, लोकांना पुरेसे पाणी उपलब्ध होत नाही व शासनाच्या निधीचा पूर्ण मोबदला जनतेला मिळत नाही. ही बाब टाळण्यासाठी जिल्हाधिका-यांनी टँकर्सच्या निविदा मागविल्यानंतर किमान दराची जी निविदा स्विकृत झाली असेल त्या निविदाधारकाकडे किती टँकर आहेत, त्याचप्रमाणे मागील ३ वर्षामध्ये सरासरी किती टँकर्स लागले आहेत व त्यानुसार चालू वर्षी अंदाजे किती टँकर्स पुरवावे लागतील, या अनुमानानुसार स्विकृत निविदाधारक पाणी पुरवठा करण्यास समर्थ नसल्यास, इतर निविदादारांशी वाटाघाटी करुन ते जर किमान स्विकृत दराने टँकर्स पुरविण्यास तयार असतील तर आवश्यकतेप्रमाणे संबंधितास टँकर्स पुरविण्याबाबत आदेश द्यावेत. सुयोग्य संनियंत्रणासाठी त्यांना तालुके वाटून देण्यात यावेत.

३) राज्यातील प्रत्येक जिल्हयाची पिण्याच्या पाण्याच्या टंचाईची तीव्रता कमी / जास्त असू शकते, त्यामुळे निविदा मागविण्यासाठी सर्व राज्यासाठी एकाच प्रकारच्या अटी व शर्ती बंधनकारक करता येणार नसल्या तरीही, आपापल्या जिल्हयातील परिस्थिती व पुर्वानुभव लक्षात घेता, टँकर मालकांची आर्थिक स्थिती व योग्य प्रमाणात टँकर पुरविण्याची क्षमता लक्षात घेऊन, जिल्हयात कोठेही कोणत्याही वेळी पाणी पुरवठा करण्यासाठी निविदाधारक सक्षम असणे, निविदाधारकांना कामाचा पूर्व अनुभव असणे, निविदाधारकाच्या मालकीचे टँकर असणे, यापुर्वी समाधानकारक काम केले असल्याचा लौकीक असणे, राष्ट्रीयकृत बँकेची गॅरंटी असणे, आयकर थकीत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र असणे, अनामत रक्कम / सुरक्षा ठेव घेणे इत्यादीबाबत सोईच्या होतील अशा, सुयोग्य अटी निर्धारित करण्याबाबत जिल्हाधिका-यांनी दक्षता घ्यावी. एखाद्या जिल्हयामध्ये पुरेसा अनुभव असलेले पुरवठादार उपलब्ध नसल्यास, आवश्यकतेनुसार विभागून ही जबाबदारी दोन किंवा तीन पुरवठादारांवर देखील सोपविता येईल. परंतु, संपुर्ण जिल्हयासाठी एकच दर विहित केलेला असेल याची जिल्हाधिका-यांनी जाणीवपूर्वक खातरजमा करुन घ्यावी.

४) ज्या जिल्हयात खाजगी टँकर्स धारकांबरोबर केलेल्या करारनाम्याची मुदत संपलेली आहे किंवा ज्या ठिकाणी निविदा मागविण्यात येवून दर निश्चित करण्यात आले नाहीत, तेथे संबंधित जिल्हाधिका-यांनी



८३४

तात्काळ ७ दिवसाचा कालावधी देऊन, नव्याने निविदा मागवून खाजगी टँकरचे दर ठरवावेत व त्याप्रमाणे पाणी पुरवठा सुरु करावा.

५) जिल्हयाच्या ज्या भागात टँकरव्दारे पाणी पुरवठा करताना पथकर (Toll) भरावा लागतो, अशा भागात प्राधान्याने शासकीय टँकरव्दारे पाणी पुरवठा करण्यात यावा. जेथे शासकीय टँकर उपलब्ध होणे शक्य नसेल अशा ठिकाणी खाजगी टँकर धारकांशी पाणी पुरवठा करण्याबाबत करारनामा करताना पथकराची बाब अंतर्भूत करावी.

**ब) टँकरने पाणी पुरवठा करताना प्रशासकीय यंत्रणेने घ्यावयाची दक्षता :-**

६) टँकरने पाणी पुरवठा करण्यात येत असलेल्या गावांना, प्रत्यक्षात पाणी पुरवठा होतो किंवा कसे, हे पाहणे आवश्यक असल्याने त्यासाठी संबंधित गावाला टँकर उपलब्ध करुन दिल्यानंतर, वेळच्या वेळी टँकर पोहचला असल्याबाबत, टँकरच्या क्षमतेबाबत आणि नियोजित खेपा होत असल्याबाबत, प्रत्येक खेपेच्या वेळी त्या गावातील पाणी पुरवठा व स्वच्छता समितीने नाम निर्देशित केलेल्या समितीवरील दोन महिला सदस्यांची टँकर चालक वेळच्या वेळी सही घेतील, याची दक्षता घ्यावी. टँकर गावात पोहचल्याची तारीख व वेळ याची त्यात न चुकता नोंद घ्यावी.

७) उपलब्ध टँकरचा जास्तीत जास्त उपयोग करुन घेण्याच्या दृष्टीने टँकरच्या जास्त खेपा होणे आवश्यक आहे. पाण्याच्या स्त्रोतापासून पाणी पुरवठयाच्या ठिकाणापर्यंत अंतर विचारात घेऊन, त्याप्रमाणे योग्य त्या खेपा ठरवून देण्यात याव्यात व त्याची पुरेपुर अंमलबजावणी होत आहे, याबाबद्दल दक्षता घ्यावी.

८) टँकरव्दारे होणा-या पाणी पुरवठयावर जिल्हाधिकारी यांनी काटेकोर नियंत्रण ठेवावे. यासाठी योग्य व्यवस्था निर्माण करुन टँकरची क्षमता, प्रत्यक्षात टँकरच्या झालेल्या खेपा, त्याचे वहन अंतर याबाबत तपशीलवार नोंदी ठेवण्यात येवून शासनाकडे अनुदानाची मागणी करताना, जिल्हाधिकारी यांनी या सर्व बाबी तपासल्या असल्याचे स्वतःच्या स्वाक्षरीचे प्रमाणपत्र सादर करावे.

९) भाडयाने लावलेल्या टँकरची देयके त्वरेने अदा केली जात नसल्याने ठेकेदाराकडून पुर्ण क्षमतेने पाणी पुरवठा होऊ शकत नाही, अशा तक्रारी शासनाकडे प्राप्त झाल्या आहेत. सबब, टँकर पुरवठादारांची देयके त्वरेने अदा होतील, तसेच संपुर्ण देयके अदा करणे शक्य नसल्यास किमान डिझेल, चालकाचे वेतन यासारख्या आवर्ती खर्चासाठी तातडीने रक्कम उपलब्ध करुन द्यावी, जेणेकरुन लोकप्रतिनिधी, कंत्राटदार व जनता यांचे कडून तक्रारीला वाव राहणार नाही. विभागीय आयुक्त / जिल्हाधिकारी यांनी यासंदर्भात विशेष काळजी घ्यावी. ब-याच जिल्हाधिकारी कार्यालयांकडे जुनी टँकरची देयके प्रलंबित असल्याचे दिसते. याबाबत दाद मिळण्याच्या दृष्टीकोनातून टँकरधारकांकडून शासनाकडे पत्रव्यवहार करण्यात येतो. यामुळे अनावश्यक पत्रव्यवहार वाढून प्रशासकीय यंत्रणेचा कालापव्यय होत असतो. सबब, अशा सर्व प्रकरणांचा तातडीने निपटारा करुन देयके अदायगीची प्रकरणे तात्काळ निकाली काढण्यात यावीत.

१०) जिल्हाधिका-यांकडून मुक्त केलेल्या निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र आणि अधिक निधीची मागणी वेळेवर केली जात नसल्याचे निदर्शनास आले आहे. परिणामी, टँकर्सची देयके तसेच, इतर साहित्य / सुटे भाग पुरविणा-या पुरवठादारांची देयके वेळेवर अदा करता येत नाहीत अशा तक्रारी येतात. अशी परिस्थिती



८६५

उद्‌भवू नये यासाठी जिल्हाधिका-यांनी योग्य ती काळजी घ्यावी व त्यावर विभागीय आयुक्तांनी नजर ठेवावी.

११) टँकरची उपाययोजना ही अतिशय खर्चिक असून त्यामुळे कोणत्याही प्रकारची मत्ता निर्माण होत नाही. सबब ही उपाययोजना अपरिहार्य परिस्थितीतच मंजूर व्हावी अशी अपेक्षा असते. मागील काही वर्षात या उपाययोजनेवरील खर्च मोठया प्रमाणात वाढला आहे. टंचाईग्रस्त भागास पाणी पुरवठा करतेवेळी वाहतूकदारांचा निव्वळ व्यापारी दृष्टीकोनातून नफा करुन घेण्याचा हेतू नसावा. सामाजिक बांधिलकीच्या नात्याने टंचाईच्या बिकट परिस्थितीवर मात करण्यासाठी प्रत्येक वाहतूकदारांचे सक्रिय सहकार्य असावे, या बाबी जिल्हाधिका-यांनी पुरवठादारांच्या निदर्शनास आणून द्याव्यात.

१२) जिल्हायात ज्या ठिकाणी टँकर्स / बैलगाडी / होडी इ. साधनांव्दारे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा केला जात असेल, त्या ठिकाणी होणा-या पिण्याच्या पाण्याच्या पुरवठयाची तपासणी करुन टी.सी.एल. पावडर, पोटॅशिअम परमँगनेट इ. औषधे टाकून ते शुध्द करुन घेण्याची दक्षता घ्यावी. त्याचप्रमाणे पाणी पुरवठा करण्यासाठी वापरण्यात येणारे टँकर्स हे स्वच्छ आहेत याची खात्री ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीने करुन घ्यावी.

१३) वित्त विभाग शासन शुध्दीपत्रक क्र.मकोनि-१०९७/प्र.क्र. १६०/९७/कोशा-४, दि. ६ ऑक्टोबर, २००० नुसार लेखाशीर्ष २२४५- नैसर्गिक आपत्ती निवारणार्थ सहाय्य या लेखाशिर्षाखालील देयकांची प्रदाने, तरतूद उपलब्ध नसल्याच्या परिस्थितीत कार्यालय प्रमुखांनी अनुदान प्राप्त करुन घेण्याबाबत लेखी हमी दिल्यास व मागणी अन्यथा योग्य असल्यास, कोषागार अधिका-याने प्रदाने नाकारु नयेत, अशी तरतूद आहे. लेखाशीर्ष " २२४५-नैसर्गिक आपत्ती निवारणार्थ सहाय्य " या लेखाशीर्षाखाली ज्या ज्या वेळी अनुदान उपलब्ध नसेल परंतु पाणी टंचाई निवारणार्थ टँकर / बैलगाडी चालू ठेवणे अपरिहार्य असेल अशावेळी विभागीय आयुक्तांकडे अनुदानाची मागणी करावी व तरतूद उपलब्ध होईपर्यंत, वित्त विभागाच्या उपरोक्त शुध्दीपत्रकानुसार कोषागारातून अनुदान मंजूर करुन घ्यावे आणि टँकरच्या डिझेल / वंगणाची देयके भागविण्यात यावीत. सदर तरतूद लक्षात घेऊन पाणी टंचाई कालावधीत कोठेही अनुदानाअभावी टँकर बंद पडणार नाही याची दक्षता घ्यावी.

२. एकंदरीत, टँकरव्दारे होणारा पाणी पुरवठा सुरळीत व्हावा व त्यावरील शासकीय खर्च मर्यादित रहावा, यासाठी उपरोक्त सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्याची दक्षता घेण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(वि. शं. धुमाळ)**
**प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**

**प्रत,**
मा. राज्यपालांचे सचिव,
मा. मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव
मा. मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,



५ee

सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
सर्व मुख्याधिकारी, नगर परिषद,
सर्व वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा,
सर्व कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद,
सर्व विभागीय उप संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा,
सर्व विभागीय मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,
संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे,
सर्व मंत्रालयीन विभाग,
विभागातील सर्व कार्यासने,
महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई,
महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर
महालेखापाल-१ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई,
महालेखापाल-२ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, नागपूर,
निवड नस्ती, पापु-१४.



७३१७